**परिपत्रक क्रमांक 249**

**विषय :- कार्यालयांत वेळेवर हजर राहण्याबाबत व गैरशिस्तबाबत .**

असे निदर्शनास आले आहे की, बरेचसे कर्मचारी कार्यालयांत वेळेवर हजर होत नाहीत. तसेच कार्यालयांत आल्यावर हजेरी पटावर सही करुन परत बाहेर जातात. कार्यालयीन शिस्तीच्या दृष्टीने ही बाब गंभीर आहे व अशा प्रकारची गैरशिस्त चालू देणे प्रशासनाच्या दृष्टीने बरोबर ठरणार नाही.

कार्यालयाच्या शिस्तीच्या दृष्टीने सर्व कर्मचाऱ्यांनी सकाळी ठीक 11.00 वाजता कार्यालयांत हजर राहावे आणि नेमून दिलेल्या कामास प्रारंभ करावा. तसेच कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत कामाव्यतिरिक्त इतरत्र फिरत राहू नये. कर्मचाऱ्यांस ठरवून दिलेल्यावेळेतच त्यांनी दुपारचे जेवण व चहा घ्यावयाचा असून यासाठी जास्त वेळ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द योग्य ती कारवाई केली जाईल.

प्रत्येक शाखेच्या अधीक्षकाने त्यांच्या परीक्षणाखाली असलेले सेवक वरील सूचना तंतोतंत पाळतात किंवा नाही हे पहावयाचे असून वरील प्रकरणी त्यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. वरील सूचना न पाळणाऱ्या सेवकांचेबाबत त्यांनी त्यांचे शाखाधिकाऱ्यांमार्फत धर्मादाय आयुक्त यांचेकडे अहवाल सादर करावयाचा आहे.

सर्व कर्मचाऱ्यांनी याची नोंद घ्यावी.

अ.द.काळे,
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

दिनांक 1 फेब्रुवारी, 1985.